**<u>ठळक बातम्या</u>**

- वस्तू आणि सेवा कराचे नवे दर उद्यापासून लागू होणार /यामुळे देशात बचत उत्सव सुरु होत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- यूनायटेड किंगडम, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियाकडून पॅलेस्टाईनला देश म्हणून अधिकृत मान्यता
- युवा क्रिकेटमधे आज ब्रिस्बेन इथं झालेल्या एकदिवसीय सामन्यात भारताचा ऑस्ट्रेलियावर ७ गडी आणि ११७ चेंडू राखून विजय

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत सुपर फोर मध्ये आज पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा भारताचा निर्णय

**<><><><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर रचनेत सुधारणा करण्याचा केंद्रसरकारचा निर्णय उद्यापासून लागू होणार आहे. त्यामुळे अनेक क्षेत्रातल्या उत्पादनांच्या किमतीवर तसंच ग्राहकांवर याचा सकारात्मक परिणाम होणार आहे. जीएसटी पुनर्रचनेचा ऑटोमोबाईल क्षेत्रावर होणारा परिणाम जाणून घेऊ या

***.... होल्ड- व्हॉईस कास्ट- कौस्तुभ- -***

*(नवरात्र किंवा विजयादशमीनिमित्त नवीन वाहन खरेदी करु इच्छिणाऱ्यांना जीएसटी कररचनेतल्या बदलाचा फायदा होणार आहे. नव्या कररचनेनुसार ऑटोमोबाईल क्षेत्रातले जीएसटी दर कमी करण्यात आले आहेत. दुचाकी आणि लहान कारवरील जीएसटी २८ टक्क्यावरून १८ टक्के करण्यात आला आहे. मोठ्या कारवर ४० टक्के जीएसटी आकारला जाईल मात्र या वाहनावरचा उपकर रद्द करण्यात आला आहे. परवडेल अशा दरात ही वाहनं उपलब्ध होतील. अनेक ऑटोमोबाईल कंपन्यांनी नव्या जीएसटी दररचनेनुसार वाहनांचे नवे दर जाहीर केले आहेत. मारुती सुझुकी या कंपनीने आपल्याकडील विविध कारच्या नव्या किमती जाहीर केल्या असून सणासाठी*

*नव्या ऑफरही दिल्या आहेत. एकूणच या निर्णयामुळे ग्राहक आणि व्यावसायिक दोन्ही बाजूने उत्साहाचे वातावरण आहे.*

*किमती कमी झाल्यामुळे  नवी वाहनं बाजारात येतील आणि ऑटोमोबाईल क्षेत्राला चालना मिळेल. याचा थेट फायदा तरुण, व्यावसायिक आणि कनिष्ठ मध्यमवर्गीयांना होणार आहे.)*

**<><><><><><>**

शारदीय नवरात्रौत्सवाबरोबरच उद्यापासून देशात बचत उत्सव सुरु होत आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं आहे. वस्तू आणि सेवा कररचनेतले बदल उद्यापासून लागू होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्र्यांनी आज राष्ट्राला संबोधित केलं. दैनंदिन गरजेच्या अनेक वस्तू आणि सेवांवरचा कर कमी झाल्यामुळे सर्वांचीच बचत होणार आहे असं ते म्हणाले….

**होल्ड - बाईट- प्रधानमंत्री-**

१२ लाख रुपयेपर्यंतच्या उत्पन्नावर प्राप्तिकर माफ केल्यामुळे आणि जीएसटीतल्या सुधारणांमुळे मिळून करदात्यांची एकूण बचत अडीच लाख कोटी रुपयांची होईल आणि आपली स्वप्न साकार करण्याची संधी मिळेल असं ते म्हणाले. व्यापारी, दुकानदार आणि उद्योजकांनाही या सुधारणांचा फायदा होणार असून त्यांनी हा फायदा ग्राहकांपर्यंत पोहचवावा असं आवाहन त्यांनी केलं. या सुधारणा आत्मनिर्भरतेची वाट सुकर करत असल्याचं सांगत त्यांनी स्वदेशी वापराचं आवाहन नागरिकांना केलं.

"नागरिक देवो भव" हाच आपल्या सरकारच्या प्रशासनाचा मंत्र आहे असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीनं  देश महासत्तेकडे वाटचाल करू शकतो. त्यामुळे राज्यात पोलीस व्यवस्थेच्या सुधारणांवर भर देण्यात आला असून सायबर सुरक्षेबरोबरच अमली पदार्थ संदर्भातल्या गुन्ह्यांप्रकरणी  राज्य शासनानं 'झिरो टॉलरन्स धोरण' अवलंबलं असल्याचं  प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र

फडनवीस यांनी केलं आहे. भाजपा युवा मोर्चाच्या 'नमो युवा रन फॉर नशा मुक्त भारत' कार्यक्रमाचा प्रारंभ मुख्यमंत्र्यांनी आज मुंबईत केला, त्यावेळी ते बोलत होते. 'नशामुक्त भारत, नशामुक्त महाराष्ट्र आणि नशामुक्त मुंबई' या संकल्पनेवर आधारित या नमो रन मॅरेथाॅनमुळे आपली तरुणाई देशभक्तीला प्राधान्य देईल तसंच देशाला सर्वोच्च स्थानी नेण्याच्या आणि आत्मनिर्भर करण्याच्या ध्यासानं प्रेरित होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. या कार्यक्रमाला पालक मंत्री मंगलप्रभात लोढा, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, मिलिंद सोमण आदी मान्यवर उपस्थित होते.

सेवा पर्वाचा भाग म्हणून **बीड**मध्ये आयोजित नमो युवा रन या मॅरेथॉन स्पर्धेला भाजपा नेत्या, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी हिरवा झेंडा दाखवला. यावेळी भारतीय जनता पक्षाचे सर्व पदाधिकारी, बीड शहरातील युवकांची मोठ्या संख्येनं उपस्थिती होती.

**<><><><><>**

यूनायटेड किंगडम, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया या देशांनी पॅलेस्टाईनला देश म्हणून औपचारिक मान्यता दिली आहे. ब्रिटनचे प्रधानमंत्री केयर स्टारमर यांनी एका व्हिडिओ निवेदनात ही घोषणा केली. शांतता आणि समाधानाच्या दिशेनं हे महत्वाचं पाऊल असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नि यांनी देशाच्या शांततेसाठी या मान्यतेला दुजोरा दिला. ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांनी देखील संयुक्त निवेदनाद्वारे पॅलेस्टाईनला स्वतंत्र आणि सार्वभौम राज्य म्हणून मान्यता दिली.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्या, १९ वर्षाखालच्या संघांमधे आज ब्रिस्बेन इथं झालेल्या एकदिवसीय सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियावर ७ गडी आणि ११७ चेंडू राखून विजय मिळवला. ऑस्ट्रेलियानं प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५०

षटकात २२५ धावा केल्या. भारतानं ३० षटकं आणि ३ चेंडू अवघ्या तीन गड्यांच्या मोबदल्यात २२७ धावा केल्या अभिज्ञान कुंडूनं नाबाद ८७, तर वेदांत त्रिवेदीनं नाबाद ६१ धावा केल्या. वैभव सूर्यवंशीनं ३८ धावांचं योगदान दिलं.

**<><><><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर फोर मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा पाकिस्तानच्या एका षटकात बिनबाद ६ धावा झाल्या होत्या.

भारतीय संघानं या स्पर्धेत पाकिस्तानविरुद्धच्या या आधीच्या सामन्यात सहज विजय नोंदवला आहे. आजचा सामना जिंकला तर अंतिम लढतीत भारताचं स्थान निश्चित होईल. अंतिम सामना येत्या २८ डिसेंबरला होणार आहे.

**<><><><><><>**

चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत सात्विक साईराज रांकिरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीला उपविजेतेपदावर समाधन मानावं लागलं. शेनझेन इथं आज अंतिम सामन्यात किम वॉन हो आणि सेओ सेउंग जे या कोरियाच्या जोडीनं त्यांचा २१-१९, २१-१५ असा पराभव केला.

**<><><><><><>**

शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता प्रदान करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारनं अनेक धोरणं आखली. याविषयी सविस्तर जाणून घेऊया....

**व्हीसी**

*(सरकारच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांसाठी निश्चित उत्पन्नाचे स्रोत खुले झाले. त्यांच्या जगण्यातील अस्थिरता संपली. याविषयी प्रधानमंत्री म्हणाले....*

***होल्ड बाईट मोदी***

*२०१३-१४ ला शेतकऱ्यांसाठी अर्थसंकल्पातील वाटा २७ हजार कोटी रुपये होता. तो वाढून १ लाख ३७ हजार कोटी रुपये इतका झाला. पीएम किसान योजनेच्या माध्यमातून अकरा कोटी शेतकऱ्यांना थेट लाभ मिळतो. किसान क्रेडिट कार्ड, पिक विमा योजना यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला असून बाजाराच्या अनिश्चिततेपासून त्याला संरक्षण मिळत आहे.)*

**<><><><><><>**

शारदीय नवरात्रौत्सवाला उद्यापासून प्रारंभ होत असून राज्यातल्या देवीच्या साडेतीन शक्तीपीठांसह सर्वच देवी मंदिरांमधे उत्सवाची तयारी उत्साहाने होत आहे. अनेक ठिकाणी सार्वजनिक नवरात्रौत्सवाचं आयोजन करण्यात आलं असून मंडपांमधे माता महिषासुरमर्दिनीच्या मूर्ती विराजमान होत आहेत. तुळजापूरचं तुळजाभवानी मंदिर कोल्हापूरचं महालक्ष्मी मंदिर, नांदेड जिल्हातल्या माहुरचं रेणुका माता मंदिर तसंच वणीच्या सप्तश्रृंगी देवी मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त जय्यत तयारी करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूरच्या एसटी आगारात भाविकांच्या सोयीसाठी पन्नास नव्या बस दाखल होणार आहेत. घटस्थापनेपासून कोजागिरी पौर्णिमेपर्यंत तुळजापूर-सोलापूर, तुळजापूर-धाराशिव, तुळजापूर- लातूर, तुळजापूर-कोल्हापूर आदी मार्गांवर गाड्यांच्या दररोज सुमारे दोनशे फेऱ्या होणार आहेत.

**<><><><><><>**

पश्चिम बंगालमधे पुढच्या वर्षी विधानसभा निवडणूक होणार असून त्या दृष्टीनं राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी मतदान केंद्रांसंबंधीच्या माहितीचं संकलन सुरु केलं आहे. या निवडणुकीत केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार कोणत्याही मतदान केंद्रावर बाराशेपेक्षा जास्त मतदार नसतील. त्यामुळे मतदान केंद्रांची संख्या वाढवण्यात येईल. या माहितीसंकलनात मतदान केंद्रावरच्या सोयी सुविधांप्रमाणेच मतदारांच्या घरांपासूनचं अंतरही नोंदण्यात येणार आहे.

**<><><><><><>**

H1B व्हिसासाठी १ लाख डॉलर आकारण्याच्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या घोषणेनंतर तातडीच्या मदतीची गरज असलेल्या भारतीयांसाठी अमेरिकेतल्या भारतीय दुतावासानं आपत्कालीन मदत क्रमांक 202-550-9931 जाहीर केला आहे.

H 1B व्हिसासाठीची शुल्कवाढ ही फक्त नव्या अर्जदारांसाठी असून ही रक्कम फक्त एकदाच भरायची आहे, असं अमेरिकेतल्या व्हाईट हाऊसच्या माध्यम प्रवक्ता केरोलीन लीविट यांनी काल प्रसिद्ध केलेल्या निवेदनात स्पष्ट  केलं.

**//<><><><><><>//**